महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुका-२०१२
नामनिर्देशनपत्रांच्या छाननीबाबत..

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
क्रमांक- रानिआ/ मनपा/२०११/प्र.क्र. १८/का.५
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक - ०१/०२/२०१२

## आदेश

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए नुसार राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या संदर्भात अधिक्षण, संचालन व नियंत्रण याबाबतची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, राज्यातील महानगरपालिका, नगर परिषदा, नगर पंचायती, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतींच्या निवडणुका मुक्त, निर्भय व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याची राज्य निवडणूक आयोगावर सांविधानिक जबाबदारी आहे.

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने पत्र क्र. रानिआ / मनपा / २०११ / प्र.क्र.१८ / का.५, दि. ३ जानेवारी, २०१२ अन्वये बृहन्मुंबई, ठाणे, उल्हासनगर, पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, नाशिक, अकोला, अमरावती व नागपूर या महानगरपालिकांच्या सार्वत्रिक व औरंगाबाद, सांगली-मिरज-कुपवाड या महानगरपालिकेच्या पोटनिवडणुकांकरिता निवडणूक कार्यक्रम जाहीर केला असून त्यानुसार नामनिर्देशनपत्राची छाननी दि. १ फेब्रुवारी, २०१२ रोजी निश्चित करण्यात आली होती.

आणि ज्याअर्थी, मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल झालेल्या रिट पिटीशन क्र. ८५३/२०१२ मध्ये न्यायालयाने दि. ३१ जानेवारी, २०१२ रोजी दिलेल्या आदेशानुसार निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी उमेदवारांनी दाखल केलेल्या नामनिर्देशनपत्रासोबतची जी जातीची वैधता प्रमाणपत्रे सन २००० च्या अधिनियमानुसार आणि माधुरी पाटील प्रकरणी विहित

करुन दिलेल्या निकषानुसार दक्षता समितीचा अहवाल घेऊन देण्यात आलेली आहेत किंवा कसे याबाबत तपासणी करणे आवश्यक असल्यामुळे राज्य निवडणूक आयोगाने पत्र क्र. रानिआ / मनपा / २०११ / प्र.क्र.१८ / का.५, दि. १ फेब्रुवारी, २०१२ अन्वये बृहन्मुंबई, ठाणे, उल्हासनगर, पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, नाशिक, अकोला, अमरावती व नागपूर या महानगरपालिकांच्या सार्वत्रिक व औरंगाबाद, सांगली-मिरज-कुपवाड या महानगरपालिकेच्या पोटनिवडणुकांमध्ये दिनांक १ फेब्रुवारी, २०१२ रोजी होणारी छाननी करतांना ज्या राखीव पदांबाबत मा. न्यायालयाच्या उपरोक्त निर्णयानुसार अधिक माहिती घेऊन निर्णय घेणे आवश्यक आहे, अशा नामनिर्देशनपत्रांची छाननी एका दिवसाने पुढे ढकलण्यात यावी. सदर छाननी दि. २ फेब्रुवारी, २०१२ रोजी सकाळी ११.०० वा. सुरु होईल. मात्र उर्वरित जागांवरील नामनिर्देशनपत्राची छाननी दि. १ फेब्रुवारी, २०१२ रोजी सुरु करावी. असे आदेशित करण्यात आले आहे.

आणि ज्याअर्थी, राखीव जागांची छाननी करण्यासंदर्भात आवश्यक माहिती अद्याप प्राप्त झालेली नसल्यामुळे या जागांची छाननी दि. २ फेब्रुवारी, २०१२ रोजी करता येणे शक्य नाही. तसेच सदर आदेश काही निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे विहित मुदतीत न गेल्यामुळे काही निवडणूक निर्णय अधिकारी यांनी वर आदेशित केल्याप्रमाणे उर्वरित जागांवरील नामनिर्देशनपत्रांची छाननी दि. १ फेब्रुवारी, २०१२ रोजी केली नसल्याची शक्यता आहे.

त्याअर्थी, आता उपरोक्त आदेशात अंशतः सुधारणा करुन असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त महानगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये नामनिर्देशनपत्राची छाननी करणे, उमेदवारी मागे घेणे तसेच चिन्ह वाटप याबाबतचा कार्यक्रम खालीलप्रमाणे देण्यात येत आहे :-

| क्र. | निवडणुकीचा टप्पा | टप्पा सुरु / पूर्ण करण्याची तारीख |
|---|---|---|
| १ | सर्वसाधारण प्रवर्गासाठी असलेल्या जागांकरिता (या प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षित असलेल्या जागांसह) दाखल झालेल्या नामनिर्देशनपत्रांची छाननी व छाननीनंतर वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे. (छाननी दि.१ फेब्रुवारी, २०१२ रोजी करण्यात आलेली नसल्यास ) | दि. २ फेब्रुवारी, २०१२ गुरुवार (सकाळी ११.०० वाजल्यापासून) |

| | | |
|---|---|---|
| २ | अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग या जागांकरिता (या सर्व प्रवर्गातील महिलांसाठी राखीव असलेल्या जागांसह) दाखल झालेल्या नामनिर्देशनपत्रांची छाननी व छाननीनंतर वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे. | दि. ३ फेब्रुवारी, २०१२ शुक्रवार (दुपारी १.०० वाजल्यापासून) |
| ३ | **उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दिनांक** | |
| | बृहन्मुंबई महानगरपालिकेकरिता | दि. ४ फेब्रुवारी, २०१२ शनिवार (सकाळी ११ ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत.) |
| | इतर सर्व महानगरपालिकांकरिता (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळून) | दि. ४ फेब्रुवारी, २०१२ शनिवार (सकाळी ११ ते दुपारी ३. ०० वाजेपर्यंत.) |
| ४ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा दिनांक | दि. ६ फेब्रुवारी, २०१२ सोमवार (सकाळी ११.०० पासून) |

निवडणुकीच्या पुढील टप्प्याचा कार्यक्रम यापूर्वीच घोषित केल्याप्रमाणे कायम राहील.

राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार,

( ध. मा. कानेड )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,
आयुक्त,
बृहन्मुंबई, ठाणे, उल्हासनगर, पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर,
नाशिक, अकोला, अमरावती, नागपूर व औरंगाबाद महानगरपालिका.

मुख्य सचिव,
महाराष्ट्र शासन.

प्रधान सचिव,
नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

सर्व संबंधित जिल्हाधिकारी.